# प्रेसनोट दि.२४/११/२०१७

## ज्येष्ठ नागरिक केंद्रीय सुरक्षा समिती बैठक

**दि.२३/११/२०१७** रोजी मा. पोलीस आयुक्त सो. यांचे अध्यक्षतेखाली सह पोलीस आयुक्त,श्री रविंद्र कदम पुणे शहर, अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री प्रदीप देशपांडे,पोलीस उप आयुक्त गुन्हे, श्री पंकज डहाणे, सहा.पोलीस आयुक्त,श्री संजय निकम, पोलीस निरीक्षक श्री संजय निकम व पोलीस निरीक्षक स्वाती थोरात, विधी सल्लागार श्री बोरुडे, पोलीस स्टेशन स्तरावरील नोडल अधिकारी,तहसिल कार्यालय,पिंपरी –चिंचवड महानगरपालीका, यशदा, सावित्रीबाई फुले, पुणे विदयापीठ,जनसेवा फाउंडेशन आयएलसी-आय पाषाण, हेल्प एज इंडीया, सामाजिक न्याय विभाग व समाजकल्याण विभागाकडील अधिकारी, अशासकिय सेवाभावी संस्था,डिग्निटी फाउंडेशन, रोटरी संघटना प्रतिनिधी व पोलीस स्टेशन स्तरावरील ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रतिनिधी असे सदर बैठकीस उपस्थीत होते.

सदर बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिक यांची केंद्रीय सुरक्षा समिती पुनर्गठीत करण्यात आली असुन सदर पोलीस आयुक्तालय पातळीवर ज्येष्ठ नागरिक केंद्रीय सुरक्षा समितीची स्थापन करण्यात आलेली आहे. सदर समितीमध्ये सामाजीक न्याय विभाग, समाजकल्याण विभाग, व अशासकिय सेवाभावी संस्था तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

ज्येष्ठ नागरिक केंद्रीय सुरक्षा समिती बैठकीमध्ये वरिष्ठ नागरिकांचा निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ कलम २४ व इतर कलमांबाबत सर्व कायदेशीर माहिती देण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांची स्वतःची मुलं, दत्तक घेतलेली मुलं, नातवंड इत्यादी हे दुर्लक्ष करित असल्यामुळे शासनाने दि.३१/१२/२००७ रोजी शासनाने सदरचा कायदा प्रसूत केलेला आहे. त्याअन्वये ज्येष्ठ नागरिकांना आपल्या उदरनिर्वाहाची मागणी तहसिलदार, जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडे करता येईल. सदरहु कार्यालयात उदरनिर्वाहाची मागणी करताना कोणत्याही वकीलांची नियुक्ती करण्याची गरज नाही. अर्जदार स्वतः केस चालवु शकतात.

पोलीस स्टेशन पातळीवर एकटे- दुकटे राहणारे ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षिततेबाबत नोंदणी वेळेत होणे गरजेचे आहे. त्याबाबत पोलीस स्टेशनला रजिस्टर अद्ययावत ठेवावे. त्यामध्ये त्यांचे व त्यांचे नातेवाईकांचे फोन नंबर्स अद्ययावत असावेत जेणे करुन त्यांच्याशी संपर्क करणे व भेटी देणे सुलभ होईल.

ज्येष्ठांना निरुपयोगी म्हणुन न पहाता त्यांचेकडे असलेल्या अनूभवाच्या खजिन्याचा फायदा आपल्याला होवु शकतो त्या दृष्टीने पावले उचलणे गरजेचे आहे. याबरोबरच ज्येष्ठ नागरिक प्रतिनिधींनी त्यांच्या अडचणी सांगुन त्यावरती सविस्तर चर्चा करण्यात आली.

पोलीस निरिक्षक<br>
ज्येष्ठ नागरिक कक्ष<br>
पुणे शहर